१. अपील प्रकरणे :

अ) एक फेज/ तीन फेज वीज ग्राहकाला विद्युत पुरवठादाराने विद्युत कायदा २००३ चे १२६ अंतर्गत जारी केलेली अंतिम गणना आदेशाविरुद्ध सदर उपभोक्त्याने दाखल केलेल्या अपिलावर विद्युत कायदा २००३ चे १२७ अंतर्गत निकाल देणे.

आ) एक फेज ग्राहकाकरिता संबंधित जिल्हाचे विद्युत निरीक्षक हे अपिलीय प्राधिकारी असून तीन फेज ग्राहकाकरिता संबंधित प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळाचे अधीक्षक अभियंता हे अपिलीय प्राधिकारी आहेत. उच्चदाब ग्राहकाकरिता मुख्य विद्युत निरीक्षक हे अपिलीय प्राधिकारी आहेत.

इ) अपील दाखल करण्याकरिता वीज ग्राहकाने वीज वितरण कंपनीद्वारे दिलेल्या अंतिम मुल्य निर्धारण रकमेच्या ५०% रक्कम वीज वितरण कंपनीस भरून अंतिम मुल्य निर्धारण रकमेच्या २% रक्कम ( कमीत कमी ४००/- रुपये किंवा जास्तीत जास्त १००००/- रुपये ) GRAS प्रणालीद्वारे शासनास अंतिम मुल्य निर्धारण देयक दिल्याचे दिनांकापासून ३० दिवसाचे आत भरणे अनिवार्य आहे.

ई) वरीलप्रमाणे अंतिम मुल्य निर्धारण रकमेच्या ५०% रक्कम वीज वितरण कंपनीस भरल्यानंतर आणि शासनास निर्धारित वाद शुल्क भरल्यानंतर वीज ग्राहकाने त्याच्या वीज वापराच्या वर्गवारी नुसार संबंधित जिल्ह्याच्या विद्युत निरीक्षक किंवा संबंधित प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळाचे अधीक्षक अभियंता किंवा मुख्य विद्युत निरीक्षक यांचेकडे पुरावा दस्ताऐवजासह अपील दाखल करावे.

उ) अपिलीय प्राधिकरणाचा अंतिम आदेश हा मा. उच्च न्यायालय येथे अपिला करिता दाखल करता येवू शकतो.

ऊ) इमारती बांधणे, रचना बांधणे, त्यामध्ये बदल करणे इत्यादी केंद्रिय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठा संबंधित उपाय) नियम - २०२३ च्या नियम क्र.६५ मध्ये अशी तरतूद आहे की जर कोणतीही व्यक्ती एखाद्या उच्च क्षमता भारवाहक तारेच्या जवळ एखादी नवी इमारत बांधू इच्छित असेल किंवा कोणतेही भर घालण्याचे, बदल करण्याचे काम करीत असेल तर त्याने वीज पुरवठादाराला व विद्युत निरीक्षकांना सूचना दिली पाहिजे. वीज पुरवठादाराने सदर लाईन कायदेशीर रीतीने घातली गेली होती याबाबत परीक्षण करून सदर व्यक्ती बदलाचा खर्च देण्यासाठी जबाबदार होत असल्यास, उच्च क्षमता भारवाहक लाईनच्या फेरबदलाचा अंदाजे खर्च किती आहे हे नोटीस देऊन त्या व्यक्तीला ३० दिवसाचे आत कळवावे. जर अंदाजे खर्चाबाबत काही वाद निर्माण झाला तर किंवा तो खर्च कोणी करायचा याबाबत वाद झाला तर ती बाब संबंधित विद्युत निरीक्षकाकडे सुपूर्द करावी.

**Appeal cases:**

i) Deciding appeal filed by consumer of single phase/three phase supply against final assessment order under section 126 of electricity act by the supplier as per section 127 of Electricity Act 2003.

ii) The appellate authority for disputes regarding single phase supply consumers is Electrical Inspector of the concerned district whereas for the three phase supply consumers the appellate authority is Superintending Engineer of concerned Regional Electrical Inspection Circle. The Chief Electrical Inspector is appellate authority for High voltage consumers.

iii) For admitting the appeal, the consumer shall pay the 50% of final assessment bill to the electricity supply company and dispute fees of 2% of final assessment bill ( Minimum 400/- rupees or maximum 10000/- rupees ) by GRAS system to the government within one month from the date of final assessment bill issued by supply company.

iv) After payment of above mentioned 50% of final assessment bill and prescribed fees to the government, the appeal with necessary evidence documents shall be submitted to the Electrical Inspector of the district or Superintending Engineer of Regional Electrical Inspection Circle or Chief Electrical Inspector of the department as per the category of consumer.

v) The final order issued by the appellate authority can be filed for appeal in Hon. High Court.

vi) Erection of or alteration to buildings, structures, etc. Regulation 65 of Central Electricity Authority (Measures relating to safety & electric supply) Regulations - 2023 states that if any person proposes to erect a new building or any other work of addition or alteration in the vicinity of overhead line, he should give notice to the supplier and electrical inspector. The electricity supplier should examine the line under reference was lawfully laid and whether the person was liable to pay the cost of alteration then send a notice to concerned with estimated cost of alteration of the overhead line within 30 days. If dispute arises for the estimated cost of alteration or the responsibility to pay such cost, the matter should be referred to electrical inspector concerned.

*******